सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!
RNI. NO. MAHBIL /25/A0192
# ग्लोबल महातेज
https://epaper.globalmahatej.com/
Postal Regd. No. JAL/443/2025-2027
वर्ष १ ले | अंक : ३५४ | बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ Ct सोने ९९.५०% | ₹ १,४८,००० |
| २२ Ct सोने ९१.६०% | ₹ १,३७,५०० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ १,१४,००० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २,३२०/- |

भाव प्रती १० ग्राम

## आजचे अभीष्टचिंतन





काशवी साळुंके
अमळनेर



सौ. विद्याताई हजारे
अमळनेर



डॉ. किशोर शहा
अमळनेर



डॉ. किरण पाटील
अमळनेर



श्री. गौरव माळी
अमळनेर



श्री. कैलास सैंदाणे
अमळनेर



श्री. विक्की ललवाणी
अमळनेर

## भेटीलागीं जीवा लागलीसे आस...!





अमळनेर : ऋषी पंचमीच्या पावन पर्वानिमित्त येथील श्री मंगळग्रह मंदिरात मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी श्री मंगळग्रह देवांसह मंदिर परिसरातील विविध देव-देवतांच्या मूर्तींच्या दर्शनासह पूजा-अभिषेक करण्यासाठी भाविकांनी अलोट गर्दी केली होती. श्री मंगळग्रह देवांच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांचे भावविभोर दृश्य. (छायाचित्रे : मयूर चौधरी)

# श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी पालिकेची यंत्रणा सज्ज!

## सहा दिवसांसाठी कर्मचारी तैनात; सकाळी ९ ते रात्री ११ पर्यंत विसर्जनस्थळी सेवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रीगणेशमूर्ती विसर्जनाची प्रक्रिया सुरळीत, सुरक्षित आणि धार्मिक भावना जपत पार पडावी, यासाठी येथील पालिकेची यंत्रणा सज्ज झाली आहे. शहरातील विविध विसर्जनस्थळी पालिकेने कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. शहरात दीड दिवस, पाच, सात, नऊ, अकरा आणि अनंत चतुर्दशी अशा सहा दिवसांसाठी दि. १६, १८, २०, २२, २४ आणि २५ सप्टेंबर रोजी पालिकेची यंत्रणा तैनात राहणार आहे.

पालिकेच्या आदेशानुसार बोरी नदीपात्र, तेल्या देव मंदिराजवळील परिसर, चोपडा रोडलगत श्री मंगळग्रह मंदिराजवळील वाहत्या पाण्याच्या साठवण बंधाऱ्याजवळ, चोपडा रोडवरील देवळी फाट्याजवळील नवकार स्टोन क्रेशर परिसर तसेच अन्य निश्चित विसर्जन केंद्रांवर मुकादम व



कामगारांची नियुक्ती केली आहे. कर्मचारी सकाळी ९ ते दुपारी ४ आणि दुपारी ४ ते रात्री ११ अशा दोन सत्रांत सेवा बजावणार आहेत. विसर्जनासाठी भाविकांनी आणलेल्या श्रीगणेशमूर्तींचे नियुक्त कर्मचाऱ्यांमार्फत विसर्जन केले जाणार आहे. यावेळी मूर्तीची कोणत्याही प्रकारे विटंबना होणार नाही, याची विशेष काळजी घेण्याचे निर्देश कर्मचाऱ्यांना दिले आहेत. तसेच धार्मिक भावना जपत विसर्जनाचे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

याशिवाय प्रभाग क्र. १३ मधील गणेशमूर्ती संकलन, संकलन केंद्रापर्यंत वाहतूक आणि ट्रॅक्टर व अन्य वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जनाच्या कालावधीत भोजनवाटपाची जबाबदारीही स्वतंत्र कर्मचाऱ्यांकडे सोपविली आहे. नियुक्त कर्मचाऱ्यांनी गणेशमूर्ती विसर्जन कालावधीत रजेवर जाऊ नये, ओळखपत्र व शासकीय गणवेश परिधान करून कर्तव्यावर उपस्थित राहावे, असे आदेशात म्हटले आहे. शासकीय सुटी किंवा साप्ताहिक सुटीच्या दिवशीही काम सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. त्याबदल्यात नियमानुसार सुटी दिली जाणार आहे. पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी स्वच्छता निरीक्षकांसह संबंधित अधिकाऱ्यांची सनियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. विसर्जनाच्या कामात कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही दिले आहेत.



अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी गणपती बाप्पांची महाआरती करताना विशेष मानकरी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर सोबत मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर, विश्वस्त अनिल अहिरराव, खान्देश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, मंगल सेवेकरी व्ही. व्ही. कुलकर्णी व जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी.



अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी गणपती बाप्पांची महाआरती करताना विशेष मानकरी श्री. जालंधर चौधरी व त्यांच्या धर्मपत्नी नगरसेविका सौ. अपूर्वाताई चौधरी. सोबत मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष सुरेश पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, मुख्य पुरोहित शुभम वैष्णव, तुषार दिक्षीत, जयेंद्र वैद्य, मंगल सेवेकरी बाळा पवार व उपस्थित भाविक. (छायाचित्र : नितेश बारी)

# ‘एनसीएमसी’ कार्ड नसतानाही ३० सप्टेंबरपर्यंत सवलत मिळणार

## एसटी महामंडळाकडून नवीन आदेश जारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे (एस.टी.) महिला व ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाड्यातील ५० टक्के सवलतीसाठी गेल्या १ सप्टेंबरपासून ‘एनसीएमसी’ कार्ड अनिवार्य केले होते. त्यामुळे कार्ड प्रणालीच्या सर्व्हरवर मोठ्या प्रमाणात हिट्स वाढले. महिला व ज्येष्ठ नागरिकांना प्रवासादरम्यान सवलत देणे अडचणीचे बनले होते. त्यामुळे येत्या बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ‘एनसीएमसी’ कार्ड नसले तरी प्रचलित पद्धतीने महिला व ज्येष्ठ नागरिकांना प्रवासात सवलत देण्यात यावी, असे नवे आदेश महाव्यवस्थापकांनी आगारांना दिले आहेत. मात्र, ज्या व्यक्तीकडे कार्ड आहे त्याला त्यातूनच सवलत द्यावी, असेही आदेशात म्हटले आहे.




# सा.बां.विभागाच्या विश्रामगृहाचा वीजपुरवठा खंडित

## ४५ दिवसांची मुदत असतानाही वीजबिलाचा भरणा नाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहाचा वीजपुरवठा महावितरण विभागाकडून खंडित करण्यात आलेला आहे. त्यामुळे पाच दिवसांपासून कार्यालयातील संपूर्ण विजेवर चालणारी यंत्रणा बंद आहे. ४५ दिवसांची मुदत असतानाही वीजबिल न भरले गेल्याने वरिष्ठ स्तरावरून वीजपुरवठा खंडित झालेला आहे. स्मार्ट मीटर लावल्यापासून वीजबिल वेळेवर न भरल्यास पुरवठा आपोआप खंडित होतो. तसाच सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विश्रामगृहाचा वीजपुरवठा खंडित झाला. गुरुवार, शुक्रवार नंतर शनिवार, रविवारची सुटी आणि सोमवारी गणेश चतुर्थी आल्याने वीजबिलाचा भरणा केला गेलेला नसल्याचे सांगण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग पूर्वी वीज मंडळाकडे ॲडव्हान्स रक्कम ठेवत होते. त्यामुळे वीजबिलाची रक्कम कपात होत होती. मात्र आता आगाऊ रक्कम ठेवता येत नाही. वीजबिल आल्यावर ते ट्रेझरीकडे पाठवावे लागते. ट्रेझरीकडून मंजूर झाल्यानंतरच वीजबिल भरता येते. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांची चूक, विलंब किंवा ट्रेझरी विभागातील कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष यामुळे पाच दिवसांपासून वीजपुरवठा खंडित आहे. याच काळात जर कोणी व्हीआयपी राजकीय व्यक्ती, अधिकारी किंवा मंत्री, आमदार आले असते तर त्यांची काय गैरसोय झाली असती. सर्वसाधारणपणे महावितरण २१ दिवस आधी बिल भरण्यासंदर्भात सूचना देते. एक महिन्यात नव्हे; तर दुसऱ्या महिन्यातही बिल न भरल्यास ४५ दिवसांत आपोआप वीजपुरवठा खंडित केला जातो. त्यामुळे वीजबिल भरण्यास स्थानिक कर्मचारी किंवा ट्रेझरी कर्मचारी जबाबदार असावा. त्यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुभाष राऊत यांनी विभागांतर्गत चौकशी सुरू असल्याने कार्यकारी अभियंत्याचा पदभार शहादा येथील कार्यकारी अभियंता शिंदे यांच्याकडे देण्यात आला आहे.

# आईच्या ममतेपुढे मृत्यू हरला; किडनी दानातून मुलाला नवजीवन

## शहापूरच्या रंजनाबाई पाटील यांचा धाडसी निर्णय; प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील शहापूर येथे आईच्या मायेपुढे जगातील प्रत्येक नाते फिके पडते, याची हृदयस्पर्शी प्रचिती नुकतीच आली आहे. गेल्या पाच वर्षांपासून प्रकृती खालावत गेलेल्या पस्तीसवर्षीय अमोल रवींद्र पाटील यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या होत्या. मात्र, त्यांच्या आई सौ. रंजनाबाई यांनी स्वतःची किडनी मुलाला दान करण्याचा धाडसी निर्णय घेतला. गुजरातमधील नडीयाद येथे अमोल यांच्यावर किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीपणे झाली. आईच्या या त्यागामुळे मुलाला नवजीवनाची संधी मिळाली आहे.

अमोल पाटील हे कामानिमित्त सुरत येथे असतात. मात्र, गेल्या काही वर्षांपासून प्रकृती खालावत गेल्याने त्यांना काम सोडावे लागले. उपचारासाठीचा वाढता खर्च आणि मुलाच्या प्रकृतीची चिंता यामुळे पाटील कुटुंबीयांसमोर मोठे संकट



रंजनाबाई पाटील



अमोल पाटील

उभे राहिले. अमोल हे कुटुंबातील एकुलते असल्याने आई-वडिलांसाठी ही परिस्थिती अधिकच भावनिक होती. अशा वेळी अमोल यांच्या आई सौ. रंजनाबाई यांनी मुलाला आपली किडनी देण्याचा निर्णय घेतला. ‘माझ्या लेकरासाठी मी काहीही करायला तयार आहे,’ या ममतेपोटी त्यांनी स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता अवयवदानासाठी पुढाकार घेतला. वडील रवींद्र पाटील हे रोजगार सेवक आहेत.

नडीयाद येथे आवश्यक वैद्यकीय तपासण्या व उपचारांनंतर किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी झाली. आईने मुलाला केवळ किडनीच दिली नाही, तर त्याला पुन्हा आयुष्य जगण्याची नवी आशा दिली आहे. या घटनेनंतर शहापूरमधील ग्रामस्थांमध्येही समाधानाचे वातावरण असून, सौ. रंजनाबाईंच्या त्यागाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आईच्या ममतेपुढे स्वतःचे दुःख, भीती आणि संभाव्य धोकेही क्षुल्लक ठरतात, याचे हे ज्वलंत उदाहरण ठरले आहे. ‘आई’ या नात्याची ताकद आणि त्यागाची उंची या घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

अमोल यांच्या कुटुंबीयांनी या कठीण काळात साथ देणाऱ्या सर्वांचे आभार मानले. अमोल यांच्या पुढील आरोग्यदायी आयुष्यासाठी सरपंच सौ. सुमनबाई दौलत पाटील, पोलीसपाटील भाऊसाहेब पाटील, प्रदीप बाळू पाटील, सुभाष पाटील, योगेश पाटील, लक्ष्मण पाटील, कैलास कोळी, विजय पाटील यांच्यासह शहापूर व अमळनेर तालुक्यातील नागरिकांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## संपादकीय

# ‘एआय’ तंत्रज्ञानाचे जगाला धोकादायक धक्के

आपण नेहमी काळ बदलतो, असे म्हणत असतो. परंतु वस्तुस्थिती अशी आहे, की काळ नव्हे; तर माणूस बदलतो आहे. माणसाने आपल्या बुद्धीच्या जोरावर अनेक नवनवीन शोध लावले. यातून अनेक भौतिक सुखसोयी मिळाल्या. जगातील अनेक देशांमध्ये तर या सुखसोयींचा इतका कडेलोट झाला की एकूणच जगाची शांतता धोक्यात येऊ लागली. म्हणजे बदललेल्या माणसाने लादलेले हे तंत्रज्ञान आता त्याच्या मानगुटीवरच बसू लागल्याची चिन्हे दिसत आहेत. वीस वर्षांपूर्वी आपण जगाच्या खूप मागे आहोत किंवा आपल्याकडे जागतिक स्तरावर ज्या-ज्या क्षेत्रात विकास दिसून येतो तो विकास भारतात यायला पुढची पन्नास ते शंभर वर्षे लागतील, असे अगदी छातीठोकपणे सांगितले जात होते. आज मात्र ती परिस्थिती राहिलेली नाही. जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यामध्ये कुठलीही एखादी नवीन गोष्ट घडली किंवा शोध लागला तरी आपल्या देशामध्ये तो पुढच्या पाच-पंधरा दिवसांत किंवा अगदी महिनाभरात येऊन धडकतो. अशा या नवीन सुविधांचा किंवा साधनांचा उपयोग करण्यासाठी किंवा ती साधने खरेदी करण्यासाठी भारतात लोकांची झुंबड उडते. अगदी रांगाही लागतात. गेल्याच वर्षी टेस्ला कंपनीने भारतामध्ये शोरूम उघडले. त्यालादेखील लोकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. त्याच्यापूर्वी ॲपल कंपनीने मुंबईत मोठे शोरूम उघडल्यावर या कंपनीचा मोबाईल खरेदी करण्याकरिता रांगा लागल्या होत्या. इतक्या वेगाने हे तंत्रज्ञान विकसित होते आहे. दर महिन्या-दोन महिन्यांनी नवीन काहीतरी शोध लागत असतात. सध्या तर रोबोटचा जमाना आला आहे. पुढच्या पाच वर्षांमध्ये संपूर्ण जगच हे कृत्रिम बुद्धीमत्ता म्हणजे आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या मगरमिठीमध्ये सापडणार आहे. एआय चॅटबॉटस, चॅटजीपीटी, क्लाड यासारखे प्रकार प्रचंड वेगाने लोकांच्या मेंदूचा ताबा घेत आहेत. त्यामध्येच आता ओपन ‘एआय’ हा प्रगत प्रकारही धुमाकूळ घालतो आहे. ‘एआय’ एजंटसारखा प्रकार तर मनुष्याच्या मेंदूबरोबरच पूर्ण शरीराचा ताबा घेतो आहे. या एजंट्सना तुम्हाला काय हवे हे सांगायचा अवकाश असतो. त्या वस्तू तो ताबडतोब उपलब्ध करून देतो.

या बदलणाऱ्या तंत्रज्ञानाबरोबर माणूसही बदलतो आहे. म्हणजेच त्याच्या व्यवहारांमध्ये किंवा भावभावनांमध्येसुद्धा मोठा बदल घडून येतो आहे. यातील प्रचंड धोके आता सगळ्या जगालाच धक्के देत आहेत. गेल्या आठवड्यात अमेरिकेतील ॲन्थ्रॉपिक नावाच्या कंपनीत संशोधक म्हणून काम करत असलेल्या आणि या क्षेत्रातील तज्ज्ञ मानल्या जाणाऱ्या जेकब कॉक्सन या २७ वर्षांच्या तरुणाने तडकाफडकी राजीनामा दिला. राजीनामा देताना त्याने ज्या काही गोष्टी एक्सवरून घोषित केल्या आहेत त्या प्रचंड चिंताजनक ठरतात. त्याने केवळ ॲन्थ्रॉपिकच सोडलेले नाही तर पूर्ण आर्टिफिशिअल इंटेलिजन्स या क्षेत्रातूनच तो कायमचा बाहेर पडला आहे. त्याचे असे म्हणणे आहे, की हा आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा सगळा प्रकार इतक्या वेगाने विकसित होतो आहे की त्यातून एक वेगळीच सुपर ह्यूमन सिस्टीम तयार होते आहे. जी सुपर इंटेलिजन्स म्हणूनही काम करू शकते. ही सगळी सिस्टीम जगातील सगळ्या प्रकारची सत्ता काबीज करू शकेल. ज्यामधून एकूणच मनुष्याच्या अस्तित्वाचेही प्रश्न निर्माण होऊ शकतील. पुढच्या वर्ष-दोन वर्षांतच या आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचे चित्रविचित्र धक्के सगळ्या जगाला सहन करावे लागतील. ज्यातून सायबर हेरगिरी किंवा अतिशय गोपनीय माहिती सहजपणे हॅक करता येणे शक्य होणार आहे. प्रत्येक देश स्वतःला सुरक्षित करण्यासाठी जागरूक असतो. परंतु एआय तंत्रज्ञानाने कोणालाही आपली सुरक्षितता गोपनीय ठेवता येणे शक्य होणार नाही. त्यातून निर्माण होणारे प्रश्न प्रत्येक देशाला आणि तेथील समाजाला सैरभैर करणारे ठरतील. अशा प्रकारचा अतिशय धोकादायक असलेला एआय प्रकार वेळीच रोखण्याचा किंवा त्याला नियंत्रित करण्याची आवश्यकता जॅकबने सांगितलेली आहे. म्हणूनच त्याने दिलेला राजीनामा आणि इशारा हा गेले काही दिवस तंत्रज्ञान विश्वामध्ये प्रचंड चर्चेचा विषय झाला आहे. एआय तंत्रज्ञानातील सगळ्या कंपन्यांना हे धोके चांगले ठावूक आहेत. परंतु आपापसातल्या स्पर्धांमुळे कोणीही थांबायलाही तयार नाही. माणसाचे हितही पाहायला तयार नाही, असा देखील थेट आरोप जॅकब कॉक्सन याने केला आहे.

आतापर्यंत एआय तंत्रज्ञानातून जगामध्ये प्रचंड बेरोजगारी निर्माण होईल, अशा प्रकारची भीती व्यक्त केली जात होती. परंतु जॅकबचा राजीनामा किंवा हे क्षेत्र सोडण्याचा निर्णय एआय तंत्रज्ञानातील भूताटकीचाच धोका सांगणारे ठरते. भारताने या तंत्रज्ञानात आपण मागे राहू नये म्हणून जोरदार तयारी सुरू केली आहे. दोन-तीन महिन्यांपूर्वी पंतप्रधानांनी आणि अगदी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनीसुद्धा भारत हा एआय तंत्रज्ञानातील लीडर होऊ शकेल इतकी भारताकडे क्षमता आणि गुणवत्ता असल्याचे अभिमानाने सांगितले होते. परंतु जॅकबसारख्या एका संशोधकाने थेट हे क्षेत्रच सोडण्याचा घेतलेला निर्णय या धोक्याचे गांभीर्य सांगणारा ठरतो. कारण या तंत्रज्ञानातील संशोधन रोखण्याकरिता सगळ्या जगालाच एकत्र यावे लागेल. तो स्वतः संशोधक असूनही एआय तंत्रज्ञानाला लगाम घालणे अशक्य असल्याचे त्याचे मत होते. म्हणजे आताच परिस्थिती हाताबाहेर गेल्याचे जॅकबचे म्हणणे आहे. एआय तंत्रज्ञानाच्या फायद्यांपेक्षाही आता तोटेच समोर येऊ लागले आहेत. लोकांचे रोजगार हिसकावून घेणारे केवळ हे तंत्रज्ञान नसून एकूणच माणसालाच निरुपयोगी, बेकार ठरविणारे, एवढेच नव्हे; तर माणुसकीच हिरावून घेण्यापर्यंत त्याचा भयंकर वापर होऊ शकतो. भारतासारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात आणि सुरक्षिततेचेही आव्हान असलेल्या देशाने आता ‘एआय’चे हे संकट बिकट होत चालल्याचे लक्षात घेण्याची वेळ आली आहे.

# चीनमधील ‘भगवान विनायक’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चीन म्हणजे पोलादी पडद्याआडचा देश. या अशा चीनचे आणि भारताचे संबंध फार प्राचीन आहेत. प्राचीन म्हणजे किती जुने? काही निश्चित सांगता येणे कठीण आहे. पहिल्या शतकात चीनमध्ये असलेल्या हिंदू मंदिरांचे पुरावे मिळाले आहेत. मात्र, हिंदू धर्माचा प्रादुर्भाव चीनमध्ये यापेक्षाही आधी झाला असावा.
आज सुद्धा चीनमध्ये अनेक हिंदू मंदिरे आहेत. जिथे हिंदू मंदिरे आहेत, तेथे गणरायांची उपस्थिती ही असतेच असते. चीनच्या या हिंदू मंदिरांमध्ये श्रीगणेशांच्या अनेक प्राचीन मूर्ती आहेत. येथे श्रीगणेशांना बुद्धी आणि समृद्धीची देवता मानले जाते.
चीनच्या फुजियान प्रांतात, क्वांझाऊ शहरात, जवळपास वीस हिंदू मंदिरे आहेत. ही सारी मंदिरे साधारण दीड हजार वर्षे जुनी आहेत. त्या काळात चीनचा, भारताच्या तमीळ भाषिक क्षेत्राशी मोठा व्यापार चालायचा. आजच्या तमिळनाडूमधून अनेक वस्तू चीनला जायच्या आणि चीनहून साखर आणि इतर पदार्थ आयात केले जायचे. स्वाभाविकतः या क्वांझाऊ शहरात मोठ्या संख्येने तमीळ व्यापारी आणि त्यांची माणसे राहायची. त्यांनीच ही मंदिरे बांधली. (२०१९ च्या डिसेंबरमध्ये चीनचे राष्ट्रपतीशी जिनपिंग भारतात आले असताना पंतप्रधान मोदींनी त्यांच्याबरोबरची एक बैठक तमिळनाडूच्या ‘महाबलीपुरम’ येथे ठेवली होती. सातव्या आणि आठव्या शतकात, पल्लवांच्या काळात, भारत आणि चीनमधील व्यापार येथून होत होता, त्याला उजळणी देण्यासाठी महाबलीपुरमची निवड केलेली होती). सन ६८५ च्या आसपास, तेंग राजवंशाच्या काळातील ही मंदिरे आहेत. या मंदिरांमध्ये नंतर स्थानिक चिनी लोकही यायला लागले आणि पूजा करायला लागले. या मंदिरांवर मेंदारिन (चिनी), संस्कृत आणि तमीळ भाषेतील शिलालेख आहेत. या सर्व मंदिरांमध्ये भगवान श्रीगणेश विराजमान आहेत. चीनच्या गंसू प्रांतात तुन-हुयांग (की दुन-हुयांग) शहरातील बौद्ध मंदिरांमध्ये श्रीगणराय, कार्तिकेयांबरोबर दिसतात.
चीनच्या उत्तर भागात झालेल्या उत्खननात जी श्रीगणेशांची प्रतिमा मिळाली आहे ती कार्बन डेटिंगच्या अनुसार सन ५३१ ची आहे.
चीनच्या अगदी दक्षिण टोकावर असलेले गुआंगदोंग हे बंदर आहे तर क्वांझाऊ किंवा चिंचूही सुद्धा बंदरांची शहरे आहेत. तमीळ व्यापारी, सागरी मार्गाने याच बंदरांच्या रस्त्याने चीनमध्ये यायचे. स्वाभाविकतः या सर्व बंदरांच्या आसपास अनेक हिंदू मंदिरांचे अवशेष आजही मिळतात. या शहरातील पुरातत्त्व संग्रहालयांमध्ये भगवान शंकर, गणेश, दुर्गादेवी इत्यादींच्या अनेक प्रतिमा आहेत.
सागरी मार्गाशिवाय भारतीयांचे चीनला जायचे इतरही मार्ग होते. आसामच्या कामरूपहून, ब्रह्मदेशाच्या रस्त्याने भारतीय व्यापारी चीनला जायचे. काश्मीरच्या सुंग-लिंग हून चीनला जाणारा अजून एक मार्ग होता. दुसऱ्या शतकापासून ते बाराव्या शतकापर्यंत, दीडशेहून जास्त चिनी विद्वानांनी भारतातील संस्कृत ग्रंथांचा चिनी भाषेत अनुवाद करायला आपल्या जीवनाचे ध्येय बनविले होते. वेदांना चिनी भाषेत ‘मांग लून’ (ज्ञान आणि बुद्धीचे विज्ञान) म्हटले जाते. अनेक ‘संहिता’ आणि ‘शास्त्रांचा’ अनुवाद चिनी भाषेत उपलब्ध आहे. गंमत म्हणजे यातील काही ग्रंथ असे आहेत, जे भारतात आलेल्या मुस्लिम आक्रांतांनी नष्ट केले होते, परंतु यांचा चिनी अनुवाद उपलब्ध आहे. उदाहरणार्थ- ‘सांख्यकारिका’ हा ग्रंथ मूळ संस्कृतमध्ये कुठेही सापडत नाही. मात्र त्याचा चिनी अनुवाद ‘जिन की शी लून’ उपलब्ध आहे. आता या चिनी ग्रंथाचा पुन्हा संस्कृत भाषेत अनुवाद केला गेला आहे. असे इतरही ग्रंथ आहेत.



आज सुद्धा चीनमध्ये चिनी भाषा बोलणारे, परंतु हिंदू जीवन पद्धती आणि परंपरा मानणारे लोक राहतात. यांची संख्या तुलनेने कमी आहे. म्हणून चीनच्या पाच प्रमुख पंथांमध्ये यांचा समावेश नाही. परंतु हा समुदाय आज सुद्धा भारतीय सण आणि उत्सव उत्साहाने साजरा करतो. ‘गणेश उत्सव’ हा चिनी पध्दतीने साजरा केला जातो.

**तिबेट**

कधी सार्वभौम राष्ट्र असलेले तिबेट आज चीनचा एक प्रांत झालेला आहे. चीनचा भाग नसताना तिबेट हा देश हिंदू आणि बौद्ध परंपरांचा देश होता. म्हणूनच तिबेटमध्ये अनेक ठिकाणी गणेश मंदिरे आहेत तसेच श्रीगणेश प्रतिमा आणि श्रीगणेशांची चित्रे बऱ्याच ठिकाणी दिसतात. बौद्ध परंपरेच्या महायान आणि वज्रायान पंथात गणपतींचे एक विशिष्ट स्थान आहे. ते फक्त विघ्नहर्ता नाहीत, तर बुद्धीचे देवता आहेत. तिबेटी भाषेत गणपतींना ‘महा-रक्त’ सुध्दा म्हटले जाते. तिबेटमध्ये श्रीगणेश, ‘विनायक गणेश’ नावाने प्रसिद्ध आहेत. हे ‘आर्य महा गणपती’ परंपरेचे श्रीगणेश आहेत. तिबेटचे या विषयाचे अभ्यासक, रॉबर्ट ब्राऊन यांनी एक पुस्तक लिहिले, ‘Ganesh, studies of an Asian God’. यात त्यांनी लिहिले आहे, की तिबेटच्या काग्युर परंपरेत असे म्हटले गेले आहे, की महात्मा बुद्ध यांनी आपला प्रिय शिष्य आनंद याला ‘गणपती ह्रदय मंत्रा’ (किंवा ‘आर्य गणपती मंत्र’) ची दीक्षा दिली होती. म्हणूनच बौद्ध प्रभाव असलेल्या देशांमध्ये बौध्द मंदिर आणि स्तुपांच्या बाहेर श्रीगणेशमूर्ती असते.
(तिबेटी भाषेत ‘विनायक स्तुति’, जी रोमन लिपीमध्ये दिलेली आहे)

o namo ‘stu te mahgaapataye svh |
o ga ga ga ga ga ga ga ga |
o namo gaapataye svh |
o gadhipataye svh |
o gae[varya svh |
o gaapatipkjitya svh |
o kaa kaa maa maa dara dara vidara vidara hana hana gha gha dhva dhva bhaja bhaja jambha jambha tambha tambha stambha stambha moha moha deha deha dadpaya dadpaya dhanasiddhi me prayaccha |

**मंगोलिया**

फक्त ३२ लाख लोकसंख्या असलेल्या चीनच्या या शेजारील देशात श्रीगणेशांची प्रभावी उपस्थिती आहे. दुर्दैवाने आपण मंगोलियाला ओळखतो ते छिंगीज खान (ज्याला आपण ‘चंगेज खान’ म्हणतो) च्या नावाने. मात्र मंगोलिया हा देश एके काळी पूर्णपणे हिंदू संस्कृतीत रमलेला आणि मुरलेला देश होता. हा देश आजही हिंदू संस्कृतीच्या प्रतिकांना अभिमानाने धारण करतो. त्यांच्या राष्ट्रध्वजाला ते सोयंबू (स्वयंभूच अपभ्रंश) म्हणतात. या देशातील अनेक मंगोल, आजही आपले नाव संस्कृत शब्दांवरून ठेवतात. मंगोलियाच्या माजी राष्ट्राध्यक्षांची नावे आहेत आंनंदिन अमर (१९३२ ते १९३६) आणि जम्सरांगिन शंभू (१९५४ ते १९७२). महिन्यांची आणि आठवड्यांची मंगोल नावे ही, भारताच्याच धर्तीवर आहेत. उदाहरणार्थ रविवारला आदिया (आदित्यवार), सोमवारला सोमिया, मंगळवारसाठी संस्कृत शब्द ‘अंगारक’ आहे. बुधवारसाठी बुद्ध, गुरुवार किंवा बृहस्पतिवारसाठी व्रिहस्पत, शुक्रवारला सुकर आणि शनिवारसाठी सांचिर हे नाव आहे.
अशा मंगोलियात, श्रीगणेशांची पूजा होणे स्वाभाविकच आहे. येथे अनेक बौद्ध मंदिरात श्रीगणेशांची प्रतिमा आहे. आपले पूर्वज आपल्या विश्वव्यापी प्रवासात, आपल्या आराध्य दैवतांनाही बरोबर घेऊन जात होते. ठिकठिकाणच्या स्थानिक लोकांमध्ये भारतीयांची चांगली स्वीकार्यता होती आणि म्हणूनच आपल्या आराध्य दैवतांची स्थानिक लोकही पूजा करू लागायचे. विशेषतः गणपतींना विघ्नहर्ता म्हटले गेले आहे. ही शुभारंभाची देवता आहे आणि म्हणूनच जगाच्या कानाकोपऱ्यात श्रीगणेशांची स्वीकार्यता आहे आणि अस्तित्वही..!






अमळनेर : खानदेश साहित्य संघ, महाराष्ट्र (धुळे) यांच्या वर्धापन दिनानिमित्त येथील खानदेश साहित्य संघाच्या शाखेतर्फे साने गुरुजी कन्या विद्यालयात झालेल्या साहित्यिक लेखन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित सौ. अनिताताई बोरसे, गोकुळ बागूल, डी. ए. धनगर, उमेश काटे, कुणाल पवार, सौ. सुनीताताई पाटील, गोपाल हडपे, सौ. सीमाताई पाटील, मुकेश पाटील आदी.

# कथा, कविता अन् बातमी लेखनातून विद्यार्थिनींच्या सर्जनशीलतेला बळ

## अमळनेरमध्ये साहित्यिक लेखन कार्यशाळा; साने गुरुजी कन्या विद्यालयातील ३५० विद्यार्थिनींचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेश साहित्य संघ, महाराष्ट्र (धुळे) यांच्या वर्धापन दिनानिमित्त येथील खानदेश साहित्य संघाच्या शाखेतर्फे साने गुरुजी कन्या विद्यालयात कथा, कविता व बातमी लेखन कार्यशाळा झाली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तथा कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. अनिताताई बोरसे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कार्यक्रमाची सुरूवात खानदेशाचे आराध्य दैवत गौराई पूजनाने झाली. या कार्यशाळेत तब्बल ३५० विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

मार्गदर्शन कार्यशाळेत ज्येष्ठ साहित्यिक गोकुळ बागूल यांनी कथा लेखनाचे विविध प्रकार, कथानकाची मांडणी, पात्ररेखा व कथा रंजक करण्याच्या पद्धती याबाबत मार्गदर्शन केले. कवी तथा गझलकार डॉ. कुणाल पवार यांनी कविता लेखनाचे प्रकार, आशय, ओघवती भाषा व प्रभावी शैली याबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. पत्रकार उमेश काटे यांनी बातमी लेखनाचे नियम, बातमीची रचना, पत्रकारितेच्या विविध पायऱ्या, बातमी लेखनाची सूत्रे याबाबत मार्गदर्शन केले. सौ. बोरसे यांनी कार्यशाळेतील मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनी लेखनाकडे निश्चितच प्रवृत्त होतील, असा विश्वास व्यक्त केला. विद्यार्थिनींना विद्यालयाकडून सातत्याने मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

खानदेश साहित्य संघाच्या तालुकाध्यक्षा सौ. सुनीताताई रत्नाकर पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. खानदेश साहित्य संघाचे जिल्हा उपाध्यक्ष डी. ए. धनगर यांनी मार्गदर्शकांचा व्यक्ती परिचय करून दिला. यावेळी खानदेश साहित्य संघाच्या सदस्या सौ. सीमाताई पाटील, आर. एम. देशमुख, सौ. मोनालीताई वंजारी, सौ. मनीषाताई वैद्य, सौ. धनश्रीताई साळुंखे आदी उपस्थित होते. मुकेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. खानदेश साहित्य संघाचे सचिव गोपाल हडपे यांनी आभार मानले. दिनकर पाटील व दानिश शेख यांनी सहकार्य केले.

# अमळनेरमध्ये पाच ठिकाणी घरफोडी

## मुंदडानगर, वामननगरातील घटना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मुंदडानगर, वामननगर व अथर्व बंगलोज परिसरात बंद घरे पाहून चोरट्यांनी पाच घरे फोडल्याची घटना शनिवारी (दि. १२ सप्टेंबर) रात्री घडली. यात सुमारे ७० हजार २०० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोकड लंपास करण्यात आली.

गणेश रामभाऊ पाटील हे मूळ गावी म्हसले येथे गेले असता रविवारी (दि. १३ सप्टेंबर) त्यांना दरवाजाचे कुलूप, कपाट व लॉकर तोडलेले आढळले. चोरट्यांनी त्यांच्या घरातून ५० हजार रुपयांच्या दोन सोन्याच्या माळी लांबवल्या. तसेच शेजारील अनिल आत्माराम महाजन यांच्या बंद घरातून १६ हजार रुपयांची सोन्याची चेन आणि ४,२०० रुपयांचे चांदीचे दागिने असा ऐवज पळवला. गणेश पाटील यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला



असून पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज तपास करत आहेत. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम व फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी भेट देऊन नमुने घेतले. दरम्यान, पिंपळे रस्त्यावरील प्रा. लोहार यांच्या घरातून १५ ग्रॅम चांदीचे शिक्के व १० ते १५ हजार रुपयांची रोकड चोरीस गेली. याशिवाय मुंबई पोलीस असलेले पी. आर. सूर्यवंशी व व्ही. डी. पाटील यांचीही बंद घरे चोरट्यांनी फोडली. एकाच रात्री पाच ठिकाणी घरफोड्या झाल्यामुळे परिसरात रात्रीची पोलीस गस्त वाढवण्याची मागणी होत आहे.

# शाडू मातीच्या गणेशमूर्तीतून प्रताप हायस्कूलचा पर्यावरणपूरक संदेश

## पालिकेच्या कार्यशाळेत ५० विद्यार्थ्यांनी साकारल्या गणेशमूर्ती; मुस्लिम विद्यार्थ्यांचाही सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप हायस्कूलमध्ये रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी पालिकेतर्फे शाडू मातीपासून गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

सुरूवातीला पालिकेतर्फे विद्यार्थ्यांना शाडू माती उपलब्ध करून देण्यात आली. शाळेचे कलाशिक्षक डी. एन. पालवे यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याची पद्धत, मूर्तीचे प्रमाण व आकार याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेतील मुस्लिम विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेत गणेशमूर्ती साकारल्या. कला आणि पर्यावरण संवर्धनाच्या माध्यमातून सामाजिक सलोख्याचा संदेश देणारा हा उपक्रम ठरला.

शाळेतील सुमारे ५० विद्यार्थ्यांनी गणेशमूर्ती तयार केल्या. विद्यार्थ्यांसमवेत शिक्षक सचिन अहिरे, सौ. जयश्रीताई पाटील व सौ. नम्रताताई दोरकर यांनीही मूर्ती निर्मितीत सहभाग घेतला. तयार केलेल्या मूर्तींना दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी रंगकाम करून आकर्षक स्वरूप दिले. या कार्यशाळेसाठी शाळेचे चेअरमन नीरज अग्रवाल यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची स्थापना विद्यार्थ्यांनी आपल्या घरी केली आहे. उत्कृष्ट गणेशमूर्ती साकारलेल्या विद्यार्थ्यांचे प्रोत्साहन वाढावे यासाठी मुख्याध्यापक ए. डी. भदाणे यांनी उत्कृष्ट मूर्ती बनविणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख स्वरूपात बक्षिसे देऊन गौरविले.

या उपक्रमासाठी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, मुख्याधिकारी गणेश शिंदे, स्वच्छता निरीक्षक संतोष जाधव, किरण कडारे, संतोष माणिक, शहर समन्वयक गणेश गढरी तसेच युनूस शेख यांचे सहकार्य लाभले. शाडू मातीचा वापर, विद्यार्थ्यांचा सहभाग आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश यामुळे प्रताप हायस्कूलमधील हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी कलाशिक्षणासोबतच पर्यावरण व सामाजिक एकतेचा अनुभव देणारा ठरला.



*अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप हायस्कूलमध्ये रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी पालिकेतर्फे शाडू मातीपासून गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांसमवेत कलाशिक्षक पालवे, सचिन अहिरे, सौ. जयश्रीताई पाटील व सौ. नम्रताताई दोरकर आदी.*

# भुसावळ-नंदुरबार एक्स्प्रेसचा विस्तार सुरतपर्यंत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुंबईत झालेल्या पश्चिम रेल्वेच्या विभागीय रेल्वे वापरकर्ता सल्लागार समितीच्या बैठकीत झेडआरयूसीसी सदस्य प्रतीक जैन यांनी महाव्यवस्थापक रामाश्रय पांडे यांच्याकडे विविध मागण्या मांडल्या. यात भुसावळ-नंदुरबार एक्स्प्रेसचा विस्तार सुरतपर्यंत करणे, खानदेश एक्स्प्रेसला एलएचबी डबे जोडणे आणि भुसावळ-दादर एक्स्प्रेस कायमस्वरूपी सुरू ठेवण्याची मागणी करण्यात आली.

याशिवाय उधना-पुणे नवीन रेल्वे सुरू करणे, सुरत-अमरावती एक्स्प्रेस रोज चालवणे, धरणगाव व अमळनेर येथे विविध गाड्यांना थांबे देणे आणि धरणगाव स्थानकावर मालधक्का व आरपीएफ चौकी सुरू करण्याची मागणी करण्यात आली. धरणगाव आणि अमळनेर स्थानकांच्या अमृत भारत योजनेअंतर्गत पुनर्विकासाचा मुद्दाही बैठकीत मांडण्यात आला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# २०१७ बैच का चर्चित आयएएस–आयपीएस कपल

सक्सेस स्टोरी

## जानिए मंदसौर कलेक्टर दिव्यांक सिंह और एस.पी. हितिका की कहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मध्य प्रदेश कैडर के चर्चित आयएएस–आयपीएस दंपति एक बार फिर सुर्खियों में हैं। २०१७ बैच के आयएएस अधिकारी दिव्यांक सिंह को मध्य प्रदेश सरकार ने मंदसौर का नया जिला कलेक्टर नियुक्त किया है। वहीं उनकी पत्नी आयपीएस हितिका वसाल फिलहाल गुना की पुलिस अधीक्षक (एस.पी.) के पद पर तैनात हैं। दोनों की सफलता और प्रेम कहानी युवाओं के लिए प्रेरणा मानी जाती है।

### कौन हैं आयएएस दिव्यांक सिंह?

आयएएस दिव्यांक सिंह साल २०१७ बैच के भारतीय प्रशासनिक सेवा अधिकारी हैं। उनका जन्म २४ मई १९९१ को मध्य प्रदेश की राजधानी भोपाल में हुआ था। उन्होंने केमिकल इंजीनियरिंग में बी.टेक की डिग्री हासिल की। इसके बाद सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू की और साल २०१६ की यूपीएससी परीक्षा में ऑल इंडिया ३४७ वीं रैंक प्राप्त कर आयएएस बनने का सपना पूरा किया।
मंदसौर कलेक्टर बनने से पहले दिव्यांक सिंह भोपाल में नगरीय प्रशासन एवं विकास विभाग में अतिरिक्त आयुक्त के रूप में कार्यरत थे। इसके अलावा वे इंदौर स्मार्ट सिटी लिमिटेड के सीईओ की जिम्मेदारी भी निभा चुके हैं। अब उन्हें मंदसौर जिले की





प्रशासनिक कमान सौंपी गई है।

### कौन हैं आयपीएस हितिका वसाल?

आयपीएस हितिका वसाल भी २०१७ बैच की भारतीय पुलिस सेवा अधिकारी हैं। उनका मूल निवास पंजाब है। उन्होंने साल २०१६ की यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में ऑल इंडिया १२१ वीं रैंक हासिल की थी।

यूपीएससी में सफलता मिलने के बाद उन्हें राजस्थान कैडर आवंटित हुआ था। हालांकि साल २०२० में आयएएस दिव्यांक सिंह से विवाह के बाद उन्होंने विवाह के आधार पर अपना कैडर बदलवाकर मध्य प्रदेश करवा लिया। वर्तमान में वे २२ मार्च २०२६ से गुना जिले की पुलिस अधीक्षक के रूप में सेवाएं दे रही हैं।

दिव्यांक सिंह और हितिका वसाल दोनों ने २०१६ की यूपीएससी परीक्षा पास की थी और २०१७ बैच के अधिकारी बने। ट्रेनिंग के दौरान दोनों की दोस्ती हुई, जो समय के साथ प्यार में बदल गई। इसके बाद दोनों ने वर्ष २०२० में विवाह कर लिया। एक ही बैच के अधिकारी होने के कारण उनकी शादी को अक्सर एक लव मैरिज के रूप में देखा जाता है।

### युवाओं के लिए प्रेरणा बना यह आयएएस–आयपीएस कपल

आज दिव्यांक सिंह और हितिका वसाल दोनों ही मध्य प्रदेश में महत्वपूर्ण प्रशासनिक जिम्मेदारियां संभाल रहे हैं। एक ओर दिव्यांक सिंह मंदसौर जिले के कलेक्टर हैं, तो दूसरी ओर हितिका वसाल गुना जिले की कानून–व्यवस्था की कमान संभाल रही हैं। कठिन मेहनत, यूपीएससी में सफलता और प्रशासनिक सेवा के साथ–साथ उनकी निजी जिंदगी की कहानी भी युवाओं को प्रेरित करती है।

# ‘मेथी’च्या भाजीचे महत्त्व



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मेथीवैज्ञानिक नाव : Trigonella foenum-graecum
चव, पोषण आणि पारंपरिक औषधी गुणांनी समृद्ध अशी घराघरातील वनस्पती.
मेथी ही लहान, वार्षिक आणि सुगंधी औषधी वनस्पती आहे. तिची पाने त्रिदलीय, हिरवी आणि मऊ असतात. फुले लहान, पांढरी किंवा फिकट पिवळ्या रंगाची असतात. मेथीच्या बिया पिवळसर–तपकिरी रंगाच्या आणि सुगंधी असतात.
मेथीची पाने, बिया आणि चूर्ण यांचा पारंपरिक वापर केला जातो.

### पारंपरिक उपयोग व वापर

* पचनक्रिया सुरळीत ठेवण्यासाठी मेथीचा वापर केला जातो.
* रक्तातील साखरेचे संतुलन राखण्यासाठी मेथीचा पारंपरिक वापर केला जातो.
* शरीराला पोषण देण्यासाठी मेथीचा आहारात समावेश केला जातो.
* रक्तातील चरबी व कोलेस्टेरॉलचे संतुलन राखण्यासाठी पारंपरिक वापर केला जातो.
* केस व त्वचेच्या आरोग्यासाठी मेथीचा बाह्य वापरही केला जातो.

### पारंपरिक आयुर्वेदानुसार उपयोग

* पचनशक्ती व पचनक्रिया सुधारण्यासाठी
* रक्तातील साखरेचे संतुलन राखण्यासाठी
* शरीराला पोषण व बळ देण्यासाठी
* रक्तातील चरबीचे संतुलन राखण्यासाठी
* केसांचे आरोग्य व मजबुती टिकवण्यासाठी
* त्वचेचे आरोग्य राखण्यासाठी

मेथी ही आहारात सहज वापरता येणारी पोषक वनस्पती आहे. तिच्या पानांचा आणि बियांचा भारतीय आहार व आयुर्वेदात पारंपरिक वापर केला जातो.

# बाळगुटीत कोणत्या औषधांचा समावेश असतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्याकडे मुलांना रोज बाळगुटी देण्याची पद्धत आहे. बाळाची प्रतिकारशक्ती उत्तम राखण्यासाठी, पचनशक्ती सुधारून अनेक आजारांवर/शारीरिक तक्रारींवर घरीच उपाय करण्यासाठी व बाळाची शारीरिक व मानसिक वाढ व्यवस्थित होण्यासाठी पूर्वापार चालत आलेली अशी ही घरगुती चिकित्सा पद्धती आहे.



**बाळगुटीमध्ये खालील औषधांचा समावेश होतो.**

**मुरुडशेंग :** ही १ पोटातील मुरडा कमी करणारी, कृमी कमी करणारी वनस्पती आहे. पोट दुखून, पातळ, फेसकट मलप्रवृत्ती कमी करणारी वनस्पती आहे.

**हिरडा :** याने यकृताचे कार्य सुधारून पचनशक्ती सुधारते. पोटात वात झाल्यास, पोट फुगले असता, पोट रोज साफ होण्यास याचा उपयोग होतो.

**पिंपळी :** श्वसनसंस्था व पचन संस्था उत्तम राखणारे असे हे औषध आहे. सर्दी, खोकला, अजीर्ण यावर उपयोगी आहे.

**जायफळ :** हे मुलाला झोप येत नसल्यास, शांत झोप लागण्यासाठी पातळ शौचास होत असल्यास ३– ४ वेढे इतकेच द्यावे.

**वेखंड :** मुलांची स्मरणशक्ती, मेधा, बुध्दी,आकलनशक्ती वाढविण्यासाठी रोज द्या. याच्या सेवनाने सर्दी, खोकला, कृमी कमी होतात. हे तीक्ष्ण असते. त्यामुळे ४–५ वेढेच द्या.

**बेहडा :** सर्दी,खोकला,जुलाब कमी होण्यासाठी उपयुक्त.

**ज्येष्ठमध :** आवाजाला गोडवा येण्यासाठी, कफ कमी करण्यासाठी, वर्ण उजळ करण्यासाठी व उष्णता कमी करण्यासाठी रोज गुटी मधून द्या.

**नागरमोथा :** कृमी कमी करण्यासाठी, लघवीचा त्रास कमी करण्यासाठी याचा उपयोग होतो.

**काकदशिंगी :** उचकी, सर्दी, खोकला, उलटी, जुलाब, ताप, दात येत असताना होणारा त्रास कमी करण्यासाठी रोज गुटी मधून द्या.

**हळकुंड :** रक्तशुद्धी करण्यासाठी, कफ, सर्दी, ताप, खोकला कमी करण्यासाठी, वर्ण उजळ करण्यासाठी व जंत कमी करण्यासाठी रोज द्या.

**कायफल :** स्वर सुधारण्या साठी व सर्दी, खोकला कमी करण्यासाठी उपयोगी.

**मायफल :** उलटी, जुलाब कमी करण्यासाठी रोज द्या.

**सागरगोटे :** जंत कमी करण्यासाठी, पोट फुगणे, दुखणे कमी करण्यासाठी रोज द्या.

**डिकेमाली :** दात येत असताना होणारे सर्व त्रास कमी करण्यासाठी द्या.

**वावडिंग :** उत्तम कृमिनाशक व बाळाची सर्वांगीण वाढ व्यवस्थित करण्यासाठी म्हणजे पचन सुधारणे, रक्त शुद्ध करणे यासाठी रोज द्या.

**सुंठ :** पोट दुखणे, सर्दी, ताप, खोकला, डोके दुखणे, जुलाब, उलटी कमी करण्यासाठी रोज द्या.

**बदाम :** पौष्टीक, बुध्दीवर्धक म्हणून रोज द्या.

**खारीक :** शरीराची ताकत वाढविण्यासाठी, हाडे बळकट करण्यासाठी पोषक म्हणून रोज द्या.

**सुके खोबरे :** हाडे बळकट करण्यासाठी, पोषक, केस व वर्ण सुधारण्यासाठी रोज द्या.

वरील सर्व औषधी आईच्या दुधामध्ये, मधात किंवा सुवर्ण सिद्ध जलामध्ये उगाळून द्या. बाळास ३५ दिवसांपासून ते २ वर्षांपर्यंत गुटी द्या. रोज सहाण व सर्व औषधी स्वच्छ ऊकळलेल्या पाण्यामध्ये धुऊन, चांगल्या स्वच्छ पांढऱ्या सुती कपड्याने पुसून ठेवा. गुटी तयार करण्याआधी आपले हात स्वच्छ साबणाने धुवा. गुटी देण्याची वेळ शक्यतो एकच ठेवा. बाळाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी व बाळाच्या सर्वांगीण विकासासाठी बाळाला रोज गुटी द्यावी.

# पाणी पिण्यासाठी पितळेचे ग्लास योग्य की अयोग्य?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पितळ तांबे आणि जस्त हे दोन धातू मिळून तयार केले जाते. पितळाच्या भांड्यांमध्ये तांबे आणि जिंक या दोन्हींचे गुणधर्म असतात. भारतात पूर्वी पासूनच पितळाचे ग्लास, लोटा आणि प्लेट्सचा वापर केला जात आहे. खासकरून पूजेच्या साहित्यात, रोजच्या खाण्यापिण्याच्या पदार्थांसाठी पितळाच्या भांड्यांचा वापर केला जातो. पितळाच्या भांड्यांचा वापर चांदसा आणि निरोगी मानला जातो.



### पितळाच्या ग्लासमध्ये पाणी पिण्याचे फायदे

जेव्हा तुम्ही पितळाच्या ग्लासमध्ये पाणी पितात तेव्हा त्यात तांबे आणि जिंकचे घटकही असतात. जिंक इम्यून सिस्टिम चांगली ठेवण्यास मदत करते ज्यामुळे त्वचा हेल्दी ठेवण्यासही मदत होते. तर तांबे पचनक्रिया चांगली ठेवते. ज्यामुळे एकाच ग्लासमधून तुम्हाला २ फायदे मिळतात. पितळाच्या ग्लासात पाणी प्यायल्याने गॅस, अपचन आणि पोट जड वाटणे या समस्यांपासून आराम मिळतो. सकाळी रिकाम्यापोटी पितळाच्या ग्लासात ठेवलेले पाणी पिणे फायदेशीर मानले जाते. ही एक सामान्य आयुर्वेदीक सवय आहे.

पितळातील तांबे आणि जिंक या दोन्हींमध्ये ओलिगोडायनामिक गुण असतात. ज्यामुळे हानीकारक बॅक्टेरिया कमी करण्यास मदत होते. पिण्याचे पाणी स्टोअर करण्यासाठी पितळ किंवा तांब्याच्या भांड्यांना महत्त्व द्या. रोज पितळाच्या बॉटलमध्ये पाणी प्यायल्याने शरीराला जिंकचा खुराक मिळतो. इम्युन सिस्टिम बळकट होते. बदलत्या वातावरणात ही सवय फायदेशीर ठरते. आयुर्वेदानसार पितळाच्या ग्लासाने पाणी प्यायल्याने शरीर डिटॉक्स होण्यास मदत होते. त्वचा चमकते, केस चांगले दिसतात. हा कोणताही जादूई उपाय नाही तर एक सिंपल, नॅचरल सवय आहे.

### पितळाच्या ग्लासातील पाणी कधी, कसे प्यावे?

सकाळी उठल्यानंतर पितळाच्या ग्लासात ठेवलेले पाणी प्या. ग्लास रात्रभर पाण्याने भरून ठेवा. जेणेकरून मिनरल्स शोषून घेण्यास व्यवस्थित वेळ मिळेल. ग्लास हलक्या हाताने लिंबू आणि मीठाने स्वच्छ करा. जेणेकरून चमक आणि गुणवत्ता टिकून राहील. पितळाच्या भांड्यात पाणी पिणे सुरक्षित मानले जाते. पितळाच्या भांड्यात पाणी पिणे फायदेशीर मानले जाते. रात्री कमीत कमी ६ ते ८ तास पितळाच्या ग्लासमध्ये पाणी ठेवा. जेणेकरून पाण्यातील मिनरल्स व्यवस्थित शोषले जातील.

# नारळातील औषधी गुणधर्म

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नारळ हे एक फळ आहे. नारळात अनेक औषधी गुण आहेत. ओल्या नारळातील गराचा वापर सौंदर्य प्रसाधनात केला जातो. नारळ पाणी स्वाथ्यासाठी पौष्टीक असते. कार्बोहाइड्रेट, प्रोटीन, मिनरल्स, व्हिटामिन असे सर्व पोषक घटके नारळापासून मिळतात. जेवणाला पर्याय म्हणून खोबरे खाऊ शकतात. नारळात फायबर्स मोठ्या प्रमाणात आढळतात. अपचन, छातीत जळजळीचा त्रास असणाऱ्यांनी नारळाचा गर सेवन केल्यास लाभ होतो.



अनियमित मासिक पाळीचा त्रास असणाऱ्या महिलांनी रोज १९ ग्रॅम ओल्या नारळाचा गर खावा. तसेच गायीचे दूधही प्यावे. मासिक पाळी संबंधी सर्व समस्या सुटतील. शीघ्रपतनाचा त्रास असणाऱ्या पुरूषांनी रोज सुखे खोबरे आणि गायीचे दूध प्यायल्याने विशेष लाभ होतो. नारळ पाणी पोटाचे विकार दूर करण्याचे काम करते. अल्सर सारखा आजार बरा होतो. किडनी, थायरॉइड, डायबिटीज, मुत्राशयाचा विकार असलेल्यांनी नारळ पाणी मोठ्या प्रमाणात सेवन करावे. नारळात अनेक व्हिटामीन असतात ते पचनास फार लाभदायी असतात. पोट दूखत असल्यास किंवा गॅस झाल्यास नारळ पाणी प्यावे. नारळ पाण्याने उलटीही थांबते.

नारळ खोकल्यावर एक रामबाण उपाय आहे. नारळाच्या दूधात एक चमचा खसखस आणि एक चमचा मध मिसळून रोज रात्री पिल्याने फायदा होतो. तोंडात फोड असल्यास ओले नारळाचा गर खावा आणि जास्तीत जास्त नारळ पाणी प्या. नारळाचे तेल रोज त्वचेवर लावल्यास त्वचा सतेज होते. आंबट दही, मुलतानी माती, खोबरेल तेल एकत्र करून लावल्यास केस चमकदार होतात. दररोज दोन तीन नारळाचे पाणी सेवन केल्यास चेहरा उजळतो.

हिवाळ्यात रोज रात्री सुखे खोबरे खावे. रात्री झोपताना चेहरा, मान, त्वचेवर खोबरेल तेल लावून हाताने हळूवार मसाज करावी. सकाळी उठल्यावर पाण्याने चेहरा धुऊन घ्यावा. काही दिवसातच सुरकुत्या नाहीशा होतील. नारळाचा गर चेहऱ्यावर लावल्याने, चेहऱ्यावरील व्रण नाहिसे होतात. गर्भवती महिलांनी रोज नारळाचा गर खाल्याने प्रकृती ठणठणीत राहते, तसेज सुदृढ बाळ जन्माला येते. खोबरेल तेलात बदाम बारिक करून टाकावे. डोके दुखीवर हे तेल रामबाण औषधीचे काम करते. पोटात जंत झाल्यास रोज सकाळी किसलेले खोबरे खावे.

# ताई–माई–अक्का स्वत:ला किती छळणार?

## उरलेसुरले–शिळेपाके खाणे कधी बंद करणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आरोग्यदायी जीवनाची सुरूवात औषधांपासून नव्हे; तर आपल्या जेवणाच्या ताटापासून होते. विशेषतः महिलांसाठी योग्य आणि सकस आहार हा केवळ आरोग्याचा विषय नसून त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक स्वास्थ्याचा पाया आहे. घरातील प्रत्येकाच्या खाण्या–पिण्याची काळजी घेणारी महिला मात्र अनेकदा स्वतःच्या आहाराकडे दुर्लक्ष करते. मुलांनी व्यवस्थित खावे, नवऱ्याने डबा व्यवस्थित न्यावा, घरातल्या वडीलधाऱ्यांना वेळेवर जेवण, पथ्य–पाणी मिळावे, याची काळजी घेते. पण हे सारे करता–करता स्वतःचे जेवण मात्र उरलेल्या वेळात घाईघाईने, शिळेपाके–उरलेसुरले खाऊन कसबस करते. आणि म्हणतेही, ‘मला काय होतेय?’ पण नीट न जेवल्याने पोषण कमी. त्यामुळे थकवा, अशक्तपणा आणि लहान–सहान आजार तिला हळूहळू घेरू लागतात.

महिलांच्या आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यांवर शरीराच्या पोषणाच्या गरजा बदलत असतात. किशोरावस्था, मासिक पाळी, गर्भधारणा, स्तनपान आणि पुढे प्री–मेनोपॉज आणि मेनोपॉज म्हणजेच रजोनिवृत्ती. प्रत्येक टप्प्यावर शरीराला विशिष्ट पोषक घटकांची गरज असते. आयर्न, कॅल्शियम, झिंक आणि महत्त्वाचे म्हणजे प्रोटीन याचा रोजच्या आहारातून पुरवठा मिळणे गरजेचे असते.

मासिक पाळीमुळे महिलांच्या शरीरातून नियमितपणे लोह काही प्रमाणात शरीराच्या बाहेर फेकले जाते. त्यामुळे आहारात लोहाची कमतरता असेल तर शरीरात रक्ताची मात्रा कमी होते. परिणामी सतत थकवा, चक्कर येणे, अशक्तपणा, धाप लागणे, कामात उत्साहच न उरणे, चिडचिड अशी लक्षणे दिसायला लागतात. त्याचप्रमाणे कॅल्शियमच्या आणि व्हिटॅमिन डी कमी झाल्याने हाडे ठिसूळ होणे, सांधे दुखणे, पाठ, मणका, कंबर दुखणे असे त्रास वारंवार होऊ लागतात.



प्रोटीनच्या कमतरतेमुळे शरीरात सगळाच बिघाड होतो, याचा परिणाम म्हणजे केस गळणे आणि आहारावर नियंत्रण सुटते. गोड खाण्याच्या क्रेव्हिंग्ज वाढतात. मग सुरू होते हे डाएट करू, ते करू म्हणत सतत डाएट सल्ले घेणे किंवा रील पाहून मनानेच काही उपाय करणे. आजकाल हेल्दी डाएट म्हटले, की अनेकदा महागडी सुपर फूड्स, परदेशी धान्य, प्रोटीन बार, विशेष प्रकारचे सीड्स, महागड्या पावडरी डोळ्यासमोर येतात. पण खरेतर पौष्टिक आहारासाठी खिशाला मोठी कात्री लावण्याची अजिबात गरज नाही. आपल्या ‘पारंपरिक भारतीय’ विशेष घरगुती आहारातच पोषणाचा खजिना दडलेला आहे. डाळी, कडधान्ये, मोड आलेली कडधान्ये, नाचणी, ज्वारी, बाजरी, राजमा, तांदूळ, गहू, मटकी, हरभरा, शेंगदाणे, गुळ, तीळ, आपले घरगुती मसाले, खसखस, पालेभाज्या, रानभाज्या, फळं, दूध, दही, ताक, अंडी, असे असंख्य पदार्थ सहज उपलब्ध आहेत. हे पदार्थ महागड्या हेल्थ फूडपेक्षा अधिक स्वस्त आणि आपल्या आहार पद्धतीत सहज जोडणारे आणि आपल्याला सहज पचणारे असतात.

**उदाहरणार्थ –** नाचणीमध्ये कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते. नाचणीची पेज नाष्ट्यामध्ये तुम्ही घेऊ शकता. डाळी आणि कडधान्ये प्रोटीनचा उत्तम स्त्रोत आहे. पालेभाज्यांमधून लोह आणि विविध अनेक जीवनसत्वे आणि खनिजे मिळतात. शेंगदाणे– गूळ– तीळ म्हणजे लोह व कॅल्शियमचे उत्तम स्त्रोत आहेत. यातूनच नॅचरल ऑइल मिळते आणि तुलनेने स्वस्त आणि सहज उपलब्ध असे हे पदार्थ आहेत. आपल्या स्वयंपाकघरातील थालीपीठे, धिरडे, मुगडाळीची खिचडी, डाळ–भात, भाजी–भाकरी, उसळ, पोहे, उपमा, दही, ताक, दही–भात, सोयाबीन, विविध प्रकारच्या चटण्या यांसारखे पदार्थ योग्य पद्धतीने आणि संतुलित प्रमाणात खाल्ले तर नक्कीच पौष्टिक आहाराचा भाग बनतात. त्यामुळे हेल्दी खाण्यासाठी नेहमी विदेशी किंवा महाग पदार्थ हवेत, हा गैरसमज दूर करणे गरजेचेच आहे. पण तेच होत नाही आणि अपुरा किंवा असंतुलित आहार दीर्घकाळ सुरू राहिल्याने शरीरावर त्याचे अनेक परिणाम होतात.

**सकस–पौष्टिक–रोज जमवायचे कसे?**

१) सकस आहार म्हणजे भरपूर आणि सतत खाणं नाही, तर सकस आहार म्हणजे शरीराला आवश्यक असणारे विविध घटक रोजच्या रोज योग्य प्रमाणात शरीराला मिळणे.

२) आपल्या रोजच्या जेवणात धान्य, भाकरी, चपाती, तूप, डाळी, पालेभाज्या, ड्रायफ्रूट्स, दूध, दही, फळभाज्या, तसंच दिवसभरात एक फळ यांचा समतोल असणे महत्त्वाचे आहे. पारंपरिक आणि पौष्टिक पदार्थ आपल्या आहारात असावे.

३) आपण रोज विसरतो तो आणि अगदी मोफत मिळणारा दुर्लक्षित घटक म्हणजे पाणी. आपण पुरेसे–योग्य प्रमाणात थोड्याथोड्या वेळाने पाणी पिणे गरजेचे आहे.




# भगवान श्रीगणेशांना 'बाप्पा' आणि 'मोरया' का म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गणेश चतुर्थीचा सण भारतात खूप आनंदात साजरा केला जातो. या दिवसापासून गणेशोत्सवाची सुरूवात होते. लोक पूर्ण श्रद्धेने विघ्नहर्ता गणपती बाप्पांचे स्वागत करतात. त्यांची नियमित पूजा आणि आरती करतात. आपण नेहमी 'गणपती बाप्पा मोरया' असा जयघोष करतो. असे करण्यामागे काही खास गोष्टी आहेत. श्रीगणेशांना 'बाप्पा' आणि 'मोरया' का म्हणतात? हे आज आपण पौराणिक कथेतून सविस्तरपणे जाणून घेऊया.

### यामागे आहे चिंचवड गावाची एक गोष्ट

जवळपास ६०० वर वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. महाराष्ट्रातील चिंचवड गावात गणपतींचा एक भक्त होता. त्यांना 'मोरया गोसावी' या नावाने ओळखले जायचे. मोरया गोसावी हे गणपती बाप्पांचे रूप होते, असे मानले जाते. त्यांचा जन्म १३७५ मध्ये झाला होता. त्यांचे वडील वामन भट्ट आणि आई पार्वती हे दोघेही गणपतींचे भक्त होते. गणपती बाप्पा त्यांच्या भक्तीने खूश झाले. त्यामुळे त्यांनी मोरया गोसावींच्या घरी जन्म घेण्याचा वरदान दिला, अशी मान्यता आहे.



पाहा काय आहे यामागची कहाणी..!

### मोरयाच्या स्वप्नात गणपतींनी सांगितले...

मोरया गोसावी लहानपणापासूनच गणपतींच्या भक्तीत तल्लीन असायचे. गणेश चतुर्थीला ते चिंचवडपासून ९५ किलोमीटर दूर असलेल्या मयूरेश्वर मंदिरात पायी दर्शनाला जायचे. गणपती बाप्पांचे वाहन मोर आहे. त्यामुळे त्यांना मयूरेश्वर म्हणतात. मोरया गोसावी यांनी सतत ११७ वर्षे मयूरेश्वर मंदिराला भेट दिली. जेव्हा ते खूप वृद्ध झाले तेव्हा त्यांना मयूरेश्वर मंदिरात जाणे कठीण झाले.

अशा स्थितीत एक दिवस गणपती बाप्पा त्यांना स्वप्नात दिसले आणि म्हणाले, "आता तुला मंदिरात येण्याची गरज नाही. उद्या तू कुंडात स्नान करून बाहेर येशील तेव्हा तुला मी दिसेन." दुसऱ्या दिवशी सकाळी मोरया गोसावींनी कुंडात स्नान केले. कुंडाबाहेर येताच त्यांना गणपतींची एक छोटी मूर्ती दिसली. ती मूर्ती अगदी स्वप्नात दिसल्यासारखीच होती.

### चिंचवड आणि मयूरेश्वर मंदिराची मान्यता

मोरया गोसावींनी ती मूर्ती चिंचवडमध्ये मंदिरात स्थापित केली. हळूहळू ते ठिकाण लोकांमध्ये प्रसिद्ध झाले. त्यामुळे भक्त आणि देवामधील अंतर कमी झाले, असे मानले जाते. तेव्हापासून लोकांनी 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष करायला सुरूवात केली. चिंचवडमधील गणपतींची मूर्ती ही मयूरेश्वर गणपतींचा अंश आहे, असे मानतात. त्यामुळे दरवर्षी त्या मूर्तीचा अंश मयूरेश्वर मंदिरामध्ये नेला जातो. त्यासाठी पालखी काढली जाते.

# श्रीगणेशांचा जीवन परिचय

१) वडील : भगवान शंकर
२) आई : देवी पार्वती
३) मोठा भाऊ : कार्तिकेय
४) बहीण : अशोकसुंदरी
५) २ पत्नी : रिद्धी व सिद्धी
६) २ पुत्र : शुभ व लाभ
७) श्रीगणेशांचे जन्मठिकाण : दोडीताल, उत्तरकाशी/कैलास पर्वत
८) श्रीगणेशांचा जन्म कशापासून झाला ? : देवी पार्वतींच्या अंगावरील मळ आणि उटण्यापासून
९) वाहन उंदीर/मूषकाचे नाव : डिंक
१०) शिव मानस पूजेत श्रीगणेशांचे नाव : प्रणव
११) श्रीगणेशांची पूजा/भक्ती करणाऱ्या संप्रदायाचे नाव : गाणपत्य
१२) श्रीगणेशांना प्रथमपूज्य का म्हणतात? : कोणत्याही कार्यारंभी अग्रपूजेचा मान असल्याने
१३) बालगणेशांचा शिरच्छेद कोणी केला ? : भगवान शंकर
१४) चूक लक्षात येताच त्यांनी श्रीगणेशांना कसे पुनरुज्जीवित केले ? : हत्तीचे शिर बसवून
१५) श्रीगणेशांनी महर्षी व्यास व्यासरचित महाभारत महाकाव्याचा निर्मितीत कोणती भूमिका पार पाडली ? : लेखनिक
१६) श्रीगणेशांना प्रिय असणारे खाद्यपदार्थ : मोदक, लाडू
१७) आवडता रंग व फुल : लाल, जास्वंदीचे
१८) प्रिय पत्री : दूर्वा, शमीपत्र
१९) हातातील मुख्य अस्त्रे : पाश, अंकुश
२०) नारद पुराणानुसार श्रीगणेशांची मुख्य १२ नावे : सुमुख, एकदंत, कपिल, गजकर्णक, लंबोदर, विकट, विघ्ननाश, विनायक, धुम्रकेतू, गणाध्यक्ष, भालचंद्र व गजानन
२१) श्रीगणेशांची सुखकर्ता, दुःखहर्ता ही लोकप्रिय आरती कोणी लिहिली? : समर्थ रामदास स्वामी.

आपण सगळे दर वर्षी गणपती बसवतो. पण का बसवतो याचे कारण कोणालाही माहीत नाही. आपल्या धर्मग्रंथानुसार भगवान वेद व्यास ऋषी यांनी महाभारत हे महाकाव्य रचले. परंतु त्यांना त्याचे लिखाण करणे शक्य होत नव्हते म्हणून त्यांनी श्रीगणेशांची आराधना केली आणि गणपती बाप्पांना महाभारत लिहिण्याची विनंती केली. त्यावेळी गणपती बाप्पांनी होकार दिला. हे लिखाण दिवस-रात्र चालले आणि त्यामुळे गणपती बाप्पांना थकवा आला. शरीरातील पाणीही वर्ज्य झाले. अशावेळी गणपतींच्या शरीराचे तापमान वाढू नये म्हणून व्यास यांनी गणपती बाप्पांना मृत्तिकेचे म्हणजे मातीचे लेपन केले आणि भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणपतींची यथासांग पूजा केली. मातीचे लेपन केले म्हणून गणपती आखडून गेले. त्यांना पार्थिव गणेश असे नाव पडले. हे लिखाण दहा दिवस चालले. अनंत चतुर्दशीला हे लिखाण संपल्यावर व्यास यांनी गणपती बाप्पांकडे पाहिले असता त्यांच्या शरीराचे तापमान खूप वाढले होते. हे तापमान कमी व्हावे आणि गणपती बाप्पांच्या अंगावरची माती निघावी म्हणून व्यासांनी गणपती बाप्पांना पाण्यात विसर्जित केले. या दहा दिवसांत व्यासांनी गणपती बाप्पांना खाण्यास वेगवेगळे पदार्थ दिले. तेव्हापासून गणपती बाप्पा बसवण्याची प्रथा पडली. ती आजही कलियुगात अव्याहत आणि अखंडितपणे चालू आहे.

श्रीगणेशांची कृपा आपल्यावर सदैव राहो, यासाठीची प्रार्थना

- कधीही न संपणारी आवड म्हणजे बाप्पा.
- बाप्पा नाही मागणार सुख तुमच्याकडे; पण दुःख सहन करण्याची ताकद द्या.
- पराभव झाला तरी हरकत नाही. पण शेवटपर्यंत झुंजायची शक्ती द्या.
- आयुष्य म्हणजे रणांगण आहे. माझी लढाई मलाच लढू द्या.
- सहाय्य केले नाही तरी हरकत नाही. पण तुमच्या मायेचा आधार द्या.
- सगळ्यांनाच कुठे फुले मिळतात. थोडे काटेही झेलायला शिकू द्या.
- पडता-पडता रडतानाही मला हसायला येऊ द्या.
- कधी वाट चुकलीच तर मात्र न मागताही मदतीचा हात द्या.
- आयुष्याच्या कोणत्याही प्रसंगात हे लंबोदरा फक्त तुम्हीच साथ द्या.
- बाप्पा तुमच्या येण्याने सुख-शांती-समृद्धी-आरोग्य व सर्व संकटांचे निवारण व्हावे, असाच आशीर्वाद आम्हा सर्व भक्तांवर राहू द्या.

# गणपती बाप्पांना शेंदूर, शमी व दुर्वा का वाहतात?

## यामागे काय धार्मिक, पौराणिक कथा आहेत?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गणपती बाप्पांना शेंदूर, शमी व दुर्वा का वाहतात? काय आहेत यामागील धार्मिक, पौराणिक कथा हे जाणून घ्या.

### शमी का वाहतात?

सामान्यतः शमीच्या झाडाची पाने शनिदेवाला अर्पण करतात. परंतु या झाडाचे पान महादेव आणि श्रीगणेशांनाही अर्पण करू शकता. श्रीगणेश पूजेने घर-कुटुंब आणि धन संबंधित सर्व प्रकारच्या अडचणी दूर होऊ शकतात. या झाडाची पाने श्रीगणेशांना दुर्वाप्रमाणेच प्रिय आहेत. मान्यतेनुसार या झाडामध्ये महादेवांचा वास आहे. गणेशोत्सव काळात गणपती बाप्पांना शमीची पाने अर्पण केल्याने बुद्धी तल्लख होते आणि सर्व दुःखे दूर होतात. मानसिक शांती प्राप्त होऊन दुर्भाग्य दूर होते. काही ज्ञानी व शास्त्र अभ्यासक यांच्यानुसार श्रीगणेश पूजेमध्ये शमीच्या पानांसोबत तांदूळ, फूल आणि शेंदूरही अर्पण करावा.

या दरम्यान खालील मंत्राचा उच्चार करावा...

**मंत्र-**

**त्वत्प्रियाणि सुपुष्पाणि कोमलानि शुभानि वै।**
**शमी दलानि हेरम्ब गृहाण गणनायक।।**



### श्रीगणेशांना शेंदूर अर्पण का करावा?

विविध देवी-देवतांच्या पूजेमध्ये अर्पण करण्यात येणाऱ्या सामग्रीमध्ये शेंदूरचेही विशेष महत्त्व आहे. विशेषतः शिव कुटुंब आणि महादेवांच्या सर्व अंश अवतारांवर शेंदूर अर्पण करण्याचे महत्त्व आहे. यामागील मान्यता अशी आहे, की शेंदूर महादेवांच्या तेजापासून उत्पन्न झालेल्या पारा धातूपासून बनते. महादेवांचे पुत्र श्रीगणेशांना शेंदूर अर्पण केल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात. खालील मंत्राचा उच्चार करत श्रीगणेशांना शेंदूर अर्पण करावा.

**मंत्र-**

**सिन्दूरं शोभनं रक्तं सौभाग्यं सुखवर्धनम्।**
**शुभदं कामदं चैव सिन्दूरं प्रतिगृह्यताम्।।**

### दुर्वांची महती काय आहे? किती वाहव्या?

### दुर्वांशिवाय गणेश पूजन अपूर्ण; महत्त्व, मान्यता आणि कथा

महादेव शिवशंकरांच्या पूजेत बेलाच्या पानाला महत्त्व आहे. भगवान श्रीविष्णूंच्या पूजेत तुळशीच्या पानांना महत्त्व आहे. त्याचप्रमाणे गणपती पूजनात दुर्वांना अत्याधिक महत्त्व आहे. गणपती बाप्पांना दुर्वा अत्यंत प्रिय आहेत. दुर्वा अर्पण केल्याशिवाय गणपती पूजन पूर्ण होत नाही. पूजेचे पुण्य प्राप्त होत नाही, असे सांगितले जाते. दुर्वा पूजनात एवढी का महत्त्वाची आहे? जाणून घेऊया.

माघ महिन्यातील गणेश जयंतीनंतर भाद्रपद चतुर्थीला महादेव शिवशंकरांनी सर्वप्रथम गणेशोत्सव साजरा केला, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते. वास्तविक पाहता प्रत्येक महिन्यातील शुद्ध आणि वद्य पक्षातील चतुर्थीला गणेश पूजनाची परंपरा आहे. मात्र, अनेकार्थाने भाद्रपदातील चतुर्थी महत्त्वाची मानली जाते.

एका मान्यतेनुसार श्रीगणेशांच्या अवतारांपैकी गुणेश याचा जन्म भाद्रपद शुद्ध चतुर्थीला झाला. श्रीगणेशांनी सिंदूर दैत्यावर विजय मिळविला, तो दिवस भाद्रपद शुद्ध चतुर्थी हाच होता. त्याप्रीत्यर्थ हा उत्सव साजरा करण्यात आला, अशी एक मान्यता आहे. या दिवशी विधीपूर्वक गणेश पूजन केले जाते.

**बाप्पांना दुर्वा का प्रिय?**

गणपती बाप्पांना दुर्वा अत्यंत प्रिय मानल्या जातात. गणेश पूजेत दुर्वांना विशेष महत्त्व आहे.

**दुर्वांमागे आहे पौराणिक कथा**

अनलासूर नावाच्या असुराचा वध करून त्याला गिळल्यानंतर गणपती बाप्पांच्या शरीरात प्रचंड उष्णता निर्माण झाली.

**दुर्वा अर्पण केल्याने मिळाला आराम**

पौराणिक कथेनुसार ऋषींनी गणपती बाप्पांना दुर्वा अर्पण केल्या. दुर्वा ग्रहण केल्यानंतर बाप्पांना आराम मिळाला.

**तेव्हापासून सुरू झाली परंपरा**

या पौराणिक कथेमुळे गणेश पूजेमध्ये दुर्वा अर्पण करण्याची परंपरा सुरू झाल्याचे मानले जाते.

**२१ अंकाला विशेष महत्त्व**

हिंदू धार्मिक परंपरेत २१ हा अंक शुभ आणि विशेष आध्यात्मिक महत्त्वाचा मानला जातो.

**२१ तत्त्वांचे प्रतीक**

एका मान्यतेनुसार ५ ज्ञानेंद्रिये, ५ कर्मेंद्रिये, ५ प्राणशक्ती, ५ तत्त्वे आणि मन मिळून २१ तत्त्वे होतात.

**देवांच्या चरणी समर्पण**

गणपती बाप्पांना २१ दुर्वा अर्पण करणे म्हणजे या २१ तत्त्वांचे देवांच्या चरणी समर्पण करण्याचे प्रतीक मानले जाते.

**दुर्वा कशा अर्पण करतात?**

पूजेनंतर दुर्वांची जुडी तयार करून त्या गणपती बाप्पांच्या चरणी अर्पण केल्या जातात. यावेळी गणपती मंत्राचा जप केला जातो.

**दुर्वांसोबत हेही अर्पण करा**

दुर्वांसोबत गणपती बाप्पांना मोदक किंवा लाडू, शेंदूर, लाल फुले आणि फळे अर्पण करण्याचीही परंपरा आहे.

# गणपती आणि संगीत यांचे नेमके नाते काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



हिंदू धर्माचे नृत्य, कला, योग आणि संगीत यांच्याशी खोल नाते आहे. हिंदू धर्माप्रमाणे ध्वनी आणि शुद्ध प्रकाश याने ब्रह्मांडाची रचना झाली आहे. भारतात संगीताची परंपरा अनादी काळापासून आहे. जवळपास हिंदूंच्या सर्वच देवी-देवतांचे आपले स्वतंत्र वाद्य यंत्र आहे. भगवान विष्णूंकडे शंख तर भगवान शिवजी यांच्याकडे डमरू आहे. नारद मुनी आणि सरस्वती यांच्याजवळ वीणा आहे, तर भगवान श्रीकृष्णांकडे बासरी. देवर्षी नारद यांच्या हातात सदैव एकतारा असतो. खजुराहो असो वा कोणार्क येथील मंदिर, प्राचीन मंदिरांच्या भिंतीवर गंधर्वांच्या मूर्तींचा समावेश आहे आणि त्यांच्याकडे सर्व प्रकाराचे वाद्य यंत्र असल्याचे दर्शविले गेले आहे.

सामवेद त्या वैदिक स्तोत्रांचा संग्रह आहे जे गीतमय आहे. संगीताचे सर्वप्रथम ग्रंथ चार वेदांपैकी एक सामवेद आहे. याच आधारावर भरत मुनी यांनी नाट्यशास्त्र लिहिले आणि नंतर संगीत रत्नाकर, अभिनव राग मंजरी लिहिले गेले. जगभरातील संगीताच्या ग्रंथांचे सामवेद हे प्रेरणा आहे.

**गणपतींचे वाद्ययंत्र ढोल :**

गणपतींची मूर्ती आणि त्यांच्या चित्रांमध्ये वीणा, सितार आणि ढोल वाजविताना दर्शविले जाते. कुठे-कुठे त्यांना बासरी वाजविताना देखील दाखवितात. तसे तर गणपती संगतीप्रेमी आहेत. तरी बहुधा त्यांना ढोल आणि मृदंग वाजविताना चित्रित केले जाते. ढोल सागर ग्रंथानुसार ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांनी ढोलची निर्मिती केली होती. भगवान विष्णूंनी तांबे हा धातू गळ्याला लावला आणि ब्रह्मा यांनी त्या ढोलमध्ये ब्रह्म कनौटी लावली आणि ढोलच्या दोन्ही बाजूस सूर्य आणि चंद्र या रूपात कातडे लावले.

जेव्हा ढोल तयार झाला तेव्हा भगवान शंकरांनी आनंदी होऊन नृत्य केले तेव्हा त्यांच्या घामातून एक कन्या 'औजी'ची निर्मिती झाली तिला ढोल वाजविण्याची जबाबदारी देण्यात आली. म्हणतात की औजीने ढोल आलटून-पालटून चार शब्द-वेद, बेताल, बाहु आणि बाईल यांचे निर्माण केले होते.

# भाद्रपदात स्त्रिया का करतात गौरींचे पूजन?

## या व्रताचा इतिहास आणि सण साजरा करण्याच्या पद्धती जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भाद्रपद मासात येणाऱ्या गौरींचे पूजन करून अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया हे व्रत करतात. या व्रतामागील इतिहास आणि सण साजरा करण्याच्या पद्धतीविषयी जाणून घ्या.

**१) तिथी**

भाद्रपद शुद्ध अष्टमी.

**२) इतिहास आणि उद्देश**

पुराणात अशी कथा आहे, की असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया श्रीमहालक्ष्मी गौरीला शरण गेल्या. त्यांनी आपले सौभाग्य अक्षय्य करण्याविषयी तिची प्रार्थना केली. श्रीमहालक्ष्मी गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार करून शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना आणि पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले; म्हणून अखंड सौभाग्य प्राप्तीसाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात.

**३) व्रत करण्याची पद्धत**

अ) हे व्रत तीन दिवस चालते. प्रांतभेदानुसार हे व्रत करण्याच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये धातूची, मातीची प्रतिमा करून अथवा कागदावर श्रीमहालक्ष्मींचे चित्र काढून, तर काही ठिकाणी नदीकाठचे पाच लहान खडे आणून त्यांचे गौरी म्हणून पूजन केले जाते. (महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाच लहान मडक्यांची उतरंड रचून त्यावर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. काही ठिकाणी सुवासिक फुले येणाऱ्या वनस्पतींची रोपे अथवा तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवतात आणि त्यावर मातीचा मुखवटा चढवतात. त्या मूर्तीला साडी नेसवून अलंकारांनी सजवतात. ही एक रूढी आहे.)

आ) गौरीची स्थापना झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तिची पूजा करून नैवेद्य दाखवतात.

इ) तिसऱ्या दिवशी गौरीचे नदीत विसर्जन करतात आणि परत येतांना नदीतील थोडी वाळू किंवा माती घरी आणून ती सर्व घरभर पसरवतात.'



**४) अशौच असेल, तर गौरी आवाहन आणि पूजन करू नये.**

भाद्रपदातील महालक्ष्मीच्या (गौरीच्या) वेळी अशौच असेल, तर गौरी आवाहन आणि पूजन करू नये. अशौचामुळे तेव्हा गौरीपूजन न करता आल्याने काही जण पुढे आश्विन मासात (महिन्यात) गौरीपूजन करतात, पण तसे करू नये. अशा प्रसंगी त्याचा लोप करणे (म्हणजे ते न करणे) युक्त होय.

**५) दोरकग्रहण**

अ) 'ज्येष्ठा गौरीच्या पूजेवेळी दोरक ठेवून विसर्जनानंतर तो दोरक घेतला जातो. दोरक घेण्याच्या विधीस 'दोरकग्रहण' असे म्हणतात. दोरक म्हणजे हाताने काढलेल्या सुताचे सोळा पदरी हळदीत भिजवून रंगवलेले सूत्र होय. सोळा ही संख्या लक्ष्मीशी निगडित असल्यामुळे दोरकातही सोळा पदर असतात.

आ) हा दोरक अत्यंत शुभकारक आणि लक्ष्मीप्राप्ती करून देणारा असतो. घरातील सर्व स्त्रिया दोरक धारण करतात. काही प्रांतांत पुरुषही आपल्या हातात हा दोरक धारण करतात. काही जण हा दोरक आपल्या धनकोशात, धान्यकोठारात, वास्तूच्या पायात आणि देवघरात ठेवतात.

इ) ज्येष्ठा गौरीपूजन हा एक कुळाचार आहे. त्यामुळे कोश (मिळकतीचे साधन) आणि चुली (स्वयंपाकघर) निराळे होताच प्रत्येक स्वतंत्र कुटुंबात हे व्रत करणे अत्यावश्यक असते.'

**गौरी, श्रीमहालक्ष्मी मुहूर्त**

गौरी/श्रीमहालक्ष्मी हा महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय सण आहे. विशेषतः महिलांचा आवडता असलेला हा सण भाद्रपद महिन्यात तीन दिवस असतो. राज्यातील प्रांतानुसार यात काही बदल दिसून येतात. कोकणात खड्यांच्या गौरी असतात तर उर्वरित महाराष्ट्रात श्रीमहालक्ष्मी मूर्ती असतात. यात काही हातांच्या, काही बिन हातांच्या, काही उभ्या, काही बसलेल्या, नवसाच्या, माहेरहून मिळालेल्या असे अनेक प्रकार असतात. सुंदर मुखवटे, देखणी आरास, रुचकर खाद्यपदार्थ, विविध दागिन्यांनी नटवलेल्या मूर्ती आणि पारंपरिक रीतिरिवाज यांमुळे तसेच काही ठिकाणी यासोबत गणेश प्रतिष्ठापना केल्याने या काळात उत्साहाला आणि आनंदाला उधाण आलेले असते. गौरींचे आगमन भाद्रपद शुक्ल पक्षात, चंद्र 'अनुराधा' नक्षत्रात असताना होते. ज्येष्ठा नक्षत्रावर गौरींचे पूजन (भोजन) होते. म्हणून यास ज्येष्ठा गौरी संबोधतात. चंद्र 'मूळ' नक्षत्रात असतांना गौरी विसर्जन होते. याच दिवशी दोरे घेणे देखील असते. नंतर दिवसभरात सूर्यास्तापूर्वी गौरी विसर्जन करावे. काही लोकांकडे पाच दिवसांचा गौरी गणेश असतो. त्यांनी याच दिवशी गौरीसोबत गणेश विसर्जन करावे.

# नैवेद्य दाखवू नका, अर्पण करा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



सहजपणे उच्चारतो आपण देवांना नैवेद्य दाखवला! उद्या त्यांनीही सुख फक्त 'दाखवले' तर? मुळात त्यांचेच घेऊन त्यांनाच देतोय तर ते तरी दाखविण्यापुरते नसावे, हो ना? मग हा नैवेद्य अर्पण कसा करावा? सांगतो, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जे अन्न आपण खाणार त्याच अन्नाचा नैवेद्य असावा. एरवी कोणी तोंडही लावणार नाही अशी बाजारातील पाच फळे देण्यापेक्षा घरात जे उत्तम असेल तेच ठेवा, फळेच हवीत, असे मुळीच नाही.

जेवणाचे ताट ठेवण्यापूर्वी बिनधास्त तो स्वयंपाक चाखून बघा. चुकून जर अळणी किंवा खारट असेल तर देवांनी तसेच खायचे का? आता हे ताट सगळे एकदम वाढू नका, तर घरातील व्यक्तीला वाढतो तसेच वाढा आणि तेवढेच वाढा. आता समोर बसून त्यांना विचारा, बाप्पा, आवडले का हो? बघा, ते होच म्हणतील. दोन मिनिटांनी परत गरम तव्यावरील चपाती वाढा, आग्रह करा की एवढे मोदक संपवलेच पाहिजेत बाप्पा तुम्ही! मधून-मधून पेल्यात तांब्यातून पाणी ओतून प्यायला द्या. शेवटी वाफाळलेला भाताची मूद वाढून त्यावर गरम वरण, तूप वाढा. स्वतः लिंबाची फोड पिळा, बघा, चुकून बी तर नाही ना पडली! आधी विचारा, बाप्पा पोट भरले का हो, घेऊ का पान? आणि मगच ताट उचला. ओलसर रुमालाने हलकेच बाप्पांचा उजवा हात आणि ओठ टिपून घ्या. असेल तर तांबूल पण द्या, किंवा स्वीट डिश म्हणून मस्त आईस्क्रीम सुद्धा! आता रोषणाई थोडी मंद करून बाप्पांना थोडी विश्रांती घेऊ द्या, तोवर आपली जेवणे होतील.

पानातल्या मेव्यापेक्षा मनातील भावाचे भुकेले आहेत आपले बाप्पा! त्यांना दहा दिवसांत एकदा तरी असा जेवायचा आग्रह नक्की करून बघा, आणि पाहा, आनंदाचे किती 'मोद'क आपल्यालाच मिळतात ते!

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)